आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

१६ डिसेंबर २०२४ - सोमवार

**ठळक बातम्या**

- राज्य विधिमंडळाचं हिवाळी अधिवेशन सुरू, ३५ हजार कोटी रुपयांहून अधिक रकमेच्या पुरवणी मागण्या सादर
- राज्यसभेत राज्यघटनेच्या अमृतमहोत्सवी वाटचालीवर विशेष चर्चा सुरू
- विख्यात तबलावादक उस्ताद झाकीर हुसैन यांचं अमेरिकेत निधन, देशभरातून शोक व्यक्त
- **आणि**
- बॉर्डर गावस्कर चषक स्पर्धेतल्या तिसऱ्या कसोटी सामन्यात भारताची पहिल्या डावात खराब सुरुवात

**<><><><><>**

राज्य विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाला आजपासून नागपुरात सुरुवात झाली. कामकाज सुरू होण्याआधी विरोधकांनी ईव्हीएम हटवा, लोकशाही वाचवा अशी घोषणाबाजी करत विधिमंडळ सदनाच्या पायऱ्यांवर आंदोलन केलं. कामकाजाच्या सुरुवातीला मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी मंत्र्यांचा परिचय सभागृहाला करुन दिला. त्यानंतर मंत्री उदय सामंत यांनी दोन्ही सभागृहात ३५ हजार ७८८ कोटी ४० लाख रुपयांच्या पुरवणी मागण्या सादर केल्या. विधानसभेच्या कामकाजाविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून…

**होल्ड व्हाइस कास्ट**

***पुरवणी मागण्यांमध्ये ३ हजार ५० कोटी रूपये मुख्यमंत्री बळीराजा वीज सवलत योजना, मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेसाठी पंधराशे कोटी, मोदी आवास घरकुल योजनेसाठी साडे बाराशे कोटी रूपये, सहकारी साखर कारखान्यांना कर्जाकरता सुमारे बाराशे कोटी रूपये यासारखे खर्च प्रस्तावित आहेत. सर्वाधिक सुमारे साडे ७ हजार कोटी रूपये सार्वजनिक बांधकाम विभागाला दिले जाणार आहेत.***

***काँग्रेस नेते नाना पटोले यांनी परभणी, बीडमधल्या हिंसाचाराच्या घटनांबद्दल स्थगन प्रस्ताव मांडण्याचा प्रयत्न केला. आज शोक प्रस्ताव असल्यानं विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी हे तो फेटाळला. या दोन्ही घटना गंभीर असून याचं राजकारण न करता विरोधकांनी विधायक सूचना कराव्यात अशी अपेक्षा मुख्यमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केली. त्यानंतर मंत्री चंद्रकांत पाटील यांनी विधानसभेच्या पटलावर आठ विधेयकं सादर केली.***

***यानंतर विधानसभा अध्यक्षांनी माजी राज्यपाल एस एम कृष्णा आणि विधानसभा सदस्य दिनकरराव जाधव यांच्या निधनाबद्दल शोक प्रस्ताव मांडले आणि सभागृहात ते स्वीकृत केले. त्यानंतर विधानसभेचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब झालं.***

**<><><><><>**

विधानपरिषदेत विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी बीड आणि परभणी हिंसाचाराचा मुद्दा उपस्थित केला. सरकारने याबाबत कारवाई करावी अशी मागणी त्यांनी केली. त्यावर या संदर्भात चर्चा करू, असं आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी दिलं.  ते म्हणाले..

**होल्ड बाईट - देवेंद्र फडणवीस...**

त्यानंतर उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी शोक प्रस्ताव सादर केला. आदरांजली अर्पण केल्यावर सभागृहाचं कामकाज उद्यापर्यंत तहकूब झालं.

**<><><><><>**

काँग्रेसनं राज्यघटनेत ज्या सुधारणा केल्या त्या लोकशाहीला बळकट करण्यापेक्षा स्वत:च्या कुटुंबाला मदत म्हणून आणि सत्ता वाचवण्यासाठी केल्या, असा आरोप केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सितारामन यांनी आज केला. राज्यसभेत आज प्रश्नोत्तरांचा तास आणि शून्य प्रहराचं कामकाज बाजूला ठेवून राज्यघटनेच्या अमृतमहोत्सवी वाटचालीवर विशेष चर्चा सुरू आहे. या चर्चेची सुरुवात सितारामन यांनी केली. घटनासमितीच्या सदस्यांप्रति आदर व्यक्त करत त्यातल्या १५ महिला सदस्यांचा त्यांनी विशेष  उल्लेख केला. भारताची राज्यघटना किती मजबूत आहे याचा अनुभव देशानं घेतल्याचं त्यांनी सांगितलं.

केंद्र सरकार राज्यघटनेला कमकुवत करत असल्याचं मत विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खर्गे यांनी चर्चेदरम्यान मांडलं. दरवर्षी दोन कोटी रा◌ेजगार देण्याच्या आश्वासनाची पूर्तता करण्यात सरकार अपयशी झाल्याचं ते म्हणाले. तत्पूर्वी नवनिर्वाचित सदस्यांनी शपथ घेतली. त्यात भाजपाच्या ३, तेलगु देसम पार्टीच्या २, तर तृणमूल काँग्रेसाच्या एका सदस्याचा समावेश आहे.

**<><><><><>**

ईव्हीएमबद्दल प्रश्न उपस्थित केल्याबद्दल केंद्रीय मंत्री प्रल्हाद जोशी यांनी आज काँग्रेसवर टीका केली. संसदेबाहेर ते प्रसारमाध्यमांशी बोलत होते. ईव्हीएमला दोष देण्यापेक्षा काँग्रेसनं आपल्या चुका मान्य कराव्यात असंही ते म्हणाले.

**<><><><><>**

उद्यम पोर्टलवर साडेपाच कोटी एमएसएमइ अर्थात सूक्ष्म, लघु, मध्यम उद्योगांची नोंद झाल्याची  माहिती केंद्रीय अर्थ राज्यमंत्री पंकज चौधरी यांनी आज दिली. ते लोकसभेत पुरवणी प्रश्नाला उत्तर देत होते. ई-श्रम पोर्टलवर ३० कोटी ४६ लाख कामगारांची नोंदणी झाल्याचंही ते म्हणाले.

**<><><><><>**

भारत आणि श्रीलंका यांच्यात आज दुहेरी कर आकारणी टाळण्यासाठी आणि कर चोरीला प्रतिबंध करण्यासाठी करार झाले. तसंच, श्रीलंकेच्या नागरी सेवा अधिकाऱ्यांच्या प्रशिक्षणासंदर्भातले सामंजस्य करारही करण्यात आले. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि श्रीलंकेचे राष्ट्रपती अनुरा कुमार दिसानायके यांच्यात आज द्विपक्षीय चर्चा झाली, त्यानंतर हे करार करण्यात आले. या चर्चेत दोन्ही नेत्यांनी परस्परहिताच्या मुद्द्यांवरही चर्चा केली.
श्रीलंकेचे राष्ट्रपती म्हणून आपल्या पहिल्या परदेश दौऱ्यासाठी दिसानायके यांनी भारताची निवड केल्याबद्दल प्रधानमंत्री मोदी यांनी आनंद व्यक्त केला. या भेटीमुळे दोन्ही देशांचे संबंध अधिक दृढ होतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

**<><><><><>**

विख्यात तबलावादक उस्ताद झाकीर हुसैन यांचं काल अमेरिकेत सॅन फ्रान्सिस्को इथं निधन झालं. ते ७३ वर्षांचे होते. हृदयविकाराचा त्रास जाणवू लागल्यामुळे त्यांना उपचारांसाठी रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. तिथंच त्यांची प्राणज्योत मालवली. गेल्या सहा दशकांच्या संगीत कारकिर्दीत

झाकीर हुसैन यांना ५ ग्रॅमी पुरस्कार मिळाले. तसंच, पद्मश्री, पद्मभूषण आणि पद्मविभूषण या देशातल्या नागरी सन्मानाचे ते मानकरी ठरले.

हुसैन यांच्या निधनामुळे संगीतविश्वाची मोठी हानी झाली आहे, त्यांना लाभलेली सर्जनशीलता आणि कल्पकता विलक्षण होती. ते भारतीय आणि पाश्चिमात्य संगीताला जोडणारा पूल होते, अशा शब्दांत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी शोकभावना व्यक्त केल्या आहेत.

हुसैन हे भारतीय शास्त्रीय संगीतविश्वात क्रांती घडवणारे खरे प्रतिभावंत म्हणून कायम स्मरणात राहतील, त्यांनी आपल्या प्रतिभेने लाखो श्रोत्यांना मंत्रमुग्ध केलं तसंच तबल्याला जागतिक स्तरावर प्रसिद्धीही मिळवून दिली, अशा शब्दांत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी समाज माध्यमावरच्या संदेशात शोक व्यक्त केला आहे. तर प्रयोगशीलता, कठोर परिश्रम, उत्तम वादनशैली आणि अंगभूत प्रतिभा यामुळे हुसैन यांनी श्रोत्यांना मंत्रमुग्ध केलं, अशा शब्दांत राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी आदरांजली वाहिली आहे.

तबल्याच्या नादमाधुर्याने संपूर्ण जगातल्या रसिकांना एका समेवर आणणारा सुपुत्र आपण गमावल्याची भावना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केली. तर भारतीय अभिजात संगीताचा समृद्ध खजिना सातासमुद्रापार नेणारे प्रतिभावान कलाकार हुसैन यांचं जाणं संपूर्ण तालविश्वाचाच ताल चुकवणारा असल्याची भावना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केली आहे.

झाकीर हुसैन यांच्या निधनामुळे जागतिक आणि भारतीय संगीत क्षेत्रात भरून न येणारं नुकसान झालं आहे. आपण त्यांचे कुटुंबीय आणि आप्तस्वकीयांच्या दुःखात सहभागी आहोत, अशी भावना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी व्यक्त केली आहे.

ज्येष्ठ सतारवादक रवी चारी यांनी देखील उस्ताद झाकीर हुसैन यांच्या निधनाबद्दल शोकभावना व्यक्त केल्या. ते म्हणाले…

**होल्ड बाईट - रवी चारी….**

**<><><><><>**

भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात ऑस्ट्रेलियात गॅबा इथं सुरु असलेल्या बॉर्डर-गावस्कर चषक कसोटी क्रिकेट मालिकेतल्या तिसऱ्या सामन्यात आज तिसऱ्या दिवशीचा खेळ संपला तेव्हा भारत ३९४ धावांनी पिछाडीवर होता. ऑस्ट्रेलियानं पहिल्या डावात केलेल्या ४४५ धावांना उत्तर देताना भारतानं चार गडी गमावत ५१ धावा केल्या आहेत. रोहित शर्मा आणि के एल राहुल खेळत असून पावसामुळे खेळाचा काही वेळ वाया गेला.

**//<><><><><>//**